# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date: 19 May 2024
## Time: 7.10 AM to 7.20 AM
## Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक: १९ मे २०२४ सकाळी ७.१० मि.

****

- लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या तर राज्यातल्या अखेरच्या टप्प्यातल्या प्रचाराची सांगता
- राज्यभरात १३ मतदार संघातल्या २६४ उमेदवारांसाठी उद्या मतदान– प्रशासकीय यंत्रणा सज्ज
- येत्या दोन जूनपासून पंढरपुरात विठ्ठलाचं थेट पदस्पर्श दर्शन पुन्हा सुरू
- बीड जिल्ह्यात सोशल मीडियावर आक्षेपार्ह संदेश प्रकरणी ४२ जणांविरोधात गुन्हे दाखल
  आणि
- थायलंड खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारतीय जोडीची पुरुष दुहेरीच्या अंतिम फेरीत धडक

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यातल्या प्रचाराची काल सांगता झाली. देशभरात सात टप्प्यात होत असलेल्या लोकसभा निवडणुकीचा हा पाचवा आणि महाराष्ट्रातला शेवटचा टप्पा आहे. या टप्प्यात राज्यातल्या उत्तर मुंबई, उत्तर मध्य मुंबई, दक्षिण मुंबई, दक्षिण मध्य मुंबई, वायव्य मुंबई, ईशान्य मुंबई, धुळे, दिंडोरी, नाशिक, पालघर, भिवंडी, कल्याण आणि ठाणे या १३ लोकसभा मतदारसंघात उद्या २० मे रोजी मतदान होत आहे. या सर्व १३ मतदारसंघांत एकूण २६४ उमेदवार निवडणूक रिंगणात असून, २४ हजार ५७९ मतदान केंद्रांवर दोन कोटी ४६ लाख ६९ हजार ५४४ मतदार, आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत.

****

धुळे लोकसभा मतदार संघातले महायुतीचे उमेदवार डॉ. सुभाष भामरे यांच्या प्रचाराची काल मालेगाव इथं उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या सभेनं सांगता झाली. महायुतीचे उमेदवार डॉ हेमंत सवरा यांच्या प्रचारासाठी योगी आदित्यनाथ यांनी काल पालघर जिल्ह्यात नालासोपारा इथं प्रचार सभेला संबोधित केलं.

****

महाविकास आघाडीतल्या घटक पक्षांनी काल मुंबईत पत्रकार परिषद घेतली. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार आणि उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे या पत्रकार परिषदेला उपस्थित होते. ही निवडणूक जनतेची असून, जनताच ती लढत असल्याचं खर्गे म्हणाले. उद्धव ठाकरे तसंच शरद पवार यांनीही, विविध मुद्यांवरुन केंद्र सरकारवर टीका केली.

****

दरम्यान, शरद पवार आणि उध्दव ठाकरे हे निवडणुकीनंतर भाजपा सोबत गेल्याशिवाय राहणार नाहीत, असं वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी म्हटलं आहे. ते काल भिवंडी इथं अपक्ष उमेदवार निलेश सांबरे यांच्या प्रचारासाठी आयोजित सभेत बोलत होते.

****

देशाचा मतदार काँग्रेसच्या भूलथापांना बळी पडणार नाही, असा विश्वास मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री भाजप नेते मोहन यादव यांनी व्यक्त केला आहे. ते काल मुंबईत भारतीय जनता पक्षाच्या प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत बोलत होते. सत्ता असताना १०० वेळा घटनेत दुरुस्त्या करणाऱ्या काँग्रेसला आता संविधान धोक्यात असल्याचा साक्षात्कार होत असल्याची टीका यादव यांनी केली.

****

दरम्यान या निवडणुकीत महायुतीचा विजय निश्चित असल्याचं, शिवसेनेचे मुख्य नेते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. काल प्रचाराची सांगता झाल्यानंतर

मुख्यमंत्री शिंदे यांनी दादर इथं शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतीस्थळाचं दर्शन घेतलं, त्यानंतर ते बोलत होते.

****

मतदानाचं प्रमाण वाढावं, यासाठी मॅजेस्टिक बुक डेपोने मतदारांसाठी विशेष सवलत योजना जाहीर केली आहे. मतदान केल्याची निशाणी, मतदानाची शाई लावल्याचे बोट दाखवून पुस्तक खरेदीवर २० टक्के सवलत मिळणार आहे. मॅजेस्टिकच्या गिरगाव, दादर, ठाणे इथल्या तिन्ही शाखांसह विलेपार्ले इथलं दीनानाथ नाट्यगृह तसंच बोरिवलीत प्रबोधनकार ठाकरे नाट्यगृहात असलेल्या मॅजेस्टिकच्या बुक स्टॉल्सवरही २० मे ते २५ मे या कालावधीसाठी ही सवलत उपलब्ध असणार आहे.

****

पुण्याच्या भारतीय चित्रपट आणि दूरचित्रवाणी संस्थेच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या `सनफ्लावर्स वेयर फर्स्ट वन्स टू नो` हा चित्रपट सध्या कान महोत्सवात यंदा सहभागी झाला आहे. या चित्रपटाची निर्मिती प्रक्रिया आणि एकूण अनुभवाबद्दल चित्रपटाचे नेपथ्यकार प्रणव खोत यांनी अधिक माहिती दिली...

****

पंढरपूर इथं येत्या दोन जून पासून विठ्ठलाचं थेट पदस्पर्श दर्शन सुरू करण्यात येणार आहे. मंदिर व्यवस्थापन समितीनं हा निर्णय घेतल्याचं, समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी सांगितलं. मंदिरातील गाभाऱ्याच्या संवर्धन कामासाठी १५ मार्चपासून विठ्ठलाचं पदस्पर्श दर्शन बंद आहे. येत्या सात जुलै पासून विठ्ठलाचे आषाढीसाठी २४ तास दर्शन सुरू असणार अशी माहिती मंदिर व्यवस्थापन समितीने दिली आहे.

****

प्रेमविवाह करणाऱ्या मुलीच्या हत्याप्रकरणी, मुलीची आई आणि भावाला वैजापूर अतिरिक्त जिल्हा आणि सत्र न्यायालयानं जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात वैजापूर तालुक्यात लाडगाव शिवारात पाच डिसेंबर २०२१ रोजी ही घटना घडली होती. शोभा मोटे असं शिक्षा झालेल्या महिलेचं नावं आहे.

****

मुंबईत घाटकोपर जाहिरात फलक अपघाताच्या पार्श्वभूमीवर बीडच्या जिल्हाधिकारी दीपा मुधोळ-मुंडे यांनी जिल्ह्यातील सहा नगर पालिका आणि पाच नगर पंचायतींच्या मुख्याधिकाऱ्यांना शहरातल्या लोखंडी ढाचा वापरुन उभालेले फलक काढण्यासाठी कारवाईचे आदेश दिले आहेत. त्यानुसार बीड नगर पालिकेच्या मुख्याधिकारी निता अंधारे यांनी बीड शहरातील ४७ ठिकाणचे लोखंडी ढाचे तात्काळ काढण्यासाठी २४ तासाची मुदत दिली आहे. जे मालक हे ढाचे काढणार नाहीत त्यांच्यावर दंडात्मक कारवाईचा इशारा देण्यात आला आहे. हे ढाचे काढण्यासाठी उद्या सोमवारपासून शहरात पालिकेच्या सहा पथकांकडून विशेष मोहीम हाती घेतली जाणार आहे.

लातूर इथं कालही तीन फलक निष्कासित करण्यात आले. याप्रकरणी दोन जणांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

****

नांदेड पोलीस आणि स्थानिक गुन्हा शाखेच्या पथकानं जिल्ह्यातून गहाळ झालेल्या ११८ मोबाईलचा तपास लावला आहे. एकूण १८ लाख ८५ हजार रुपयांचे मोबाईल पोलिसांनी हस्तगत केले असून, पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या हस्ते ६० मोबाईलचं मूळ मालकांना वाटप करण्यात आलं. उर्वरित मोबाईलच्या ईएमइआय क्रमांकाची माहिती ट्विटर वर देण्यात आली आहे.

****

बीड जिल्ह्यात सामाजिक संपर्क माध्यमांवर आक्षेपार्ह संदेश प्रसारित करुन समाजातील सलोखा आणि शांतता भंग करण्याचा प्रयत्न करणाऱ्या ४२ समाज कंटकांविरोधात, जिल्ह्यातल्या विविध पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. जिल्हा पोलिस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांनी ही माहिती दिली. सामाजिक संपर्क माध्यमांवरील हा आक्षेपार्ह मजकूरही हटवण्यात आला असल्याचं, ठाकूर यांनी सांगितलं.

****

भारतीय बॅडमिंटनपटू चिराग शेट्टी आणि सात्विक साईराज रंकीरेड्डी यांच्या जोडीने थायलंड खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत पुरुष दुहेरीच्या अंतिम फेरीत धडक मारली आहे. काल बँकॉक इथं झालेल्या उपांत्य फेरीच्या सामन्यात सात्विक चिराग जोडीने

तैवानी जोडीचा २१-११, २१-१२ असा सरळ दोन गेम्समध्ये पराभव केला. आज तैवान आणि चिनी बॅडमिंटनपटूंच्या जोडीसोबत त्यांचा विजेतेपदासाठीचा सामना होणार आहे.

****

इंडियन प्रीमियर लीग -आयपीएल क्रिकेट स्पर्धेत काल बंगळुरु इथं चेन्नई सुपर किंग्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु यांच्यात झालेल्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुनं चेन्नई सुपर किंग्सवर २७ धावांनी विजय मिळवला. या विजयासोबत बंगळुरुच्या संघानं प्ले ऑफ मधील आपलं स्थान निश्चित केलं आहे.

दरम्यान, या स्पर्धेत आज दोन सामने खेळवले जातील. पहिला सामना पंजाब किंग्स आणि सन रायझर्स हैदराबाद यांच्यात तर दुसरा सामना कोलकाता नाईट रायडर्स आणि राजस्थान रॉयल्स यांच्यात होईल.

****

परभणीतल्या वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या ५२ व्या वर्धापन दिनानिमित्त, काल खरीप पीक परिसंवाद आणि कृषी प्रदर्शन भरवण्यात आलं होतं. राज्याचे मृद आणि जलसंधारण विभागाचे सचिव सुनील चव्हाण यांच्या हस्ते या प्रदर्शनाचं उदघाटन झालं. विद्यापीठाने भविष्यात पाण्याचा ताण सहन करणारी, खोलवर मुळ्या जाणारी कोरडवाहू शेतीस पूरक वाणं विकसित करावीत, तसंच शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञाचा वापर करून गुणात्मक दर्जाची शेती करून प्रगती साधावी, असं आवाहन चव्हाण यांनी यावेळी केलं. कुलगुरू डॉ. इन्द्र मणि यांच्यासह उपस्थित तज्ज्ञांनी यावेळी मार्गदर्शन केलं. या प्रदर्शनात शेतकऱ्यांना अत्याधुनिक यंत्रांसह ड्रोनचं प्रात्यक्षिकही दाखवण्यात आलं.

****

लातूर जिल्ह्यात हरित क्षेत्र वाढवण्यासाठी यंदा लोकसहभागातून मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड केली जाणार आहे. 'माझा जिल्हा, हरित जिल्हा या राबविण्यात येणाऱ्या उपक्रमात सहभागी होण्याचं आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केलं आहे. याअंतर्गत गाव आणि शहरी पातळीवर वृक्ष लागवडीसाठी खड्डे खोदणं, वृक्षांच्या बिया संकलित करून रोपं तयार करणं, शालेय मुलांच्या हस्ते वृक्षारोपण,

आदी उपक्रम राबवले जाणार आहेत. या मोहिमेत विशेष कामगिरी करणारे अधिकारी, कर्मचारी, पत्रकार, तसंच नागरिकांचाही गौरव करण्यात येणार असल्याचं जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितलं.

****

उन्हाळी सुट्यात होणारी प्रवाशांची गर्दी लक्षात घेवून दक्षिण मध्य रेल्वेनं नांदेड–हडपसर–नांदेड विशेष गाडीच्या १२ फेऱ्या मंजूर केल्या आहेत. ही गाडी २२ मे ते २६ जून पर्यंत दर बुधवारी नांदेड इथून रात्री नऊ वाजता तर २३ मे ते २७ जून पर्यंत दर गुरुवारी हडपसर इथून दुपारी सव्वा तीन वाजता सुटणार आहे.

दरम्यान, नांदेड इथून सुटणारी नांदेड – अमृतसर सचखंड एक्सप्रेस आज रद्द करण्यात आली आहे. दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड जनसंपर्क कार्यालयानं ही माहिती कळवली आहे.

****